**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक १० सप्टेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **महाराष्ट्र जनसुरक्षा कायद्याविरोधात महाविकास आघाडीतर्फे आज राज्यात विविध ठिकाणी आंदोलन**

2. **भविष्यात प्रत्येक पेट्रोल पंपावर 'नो पीयूसी नो फ्युएल' उपक्रमाची अंमलबजावणी करण्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे निर्देश**

3. **महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागामार्फत रामटेक इथं शेतकरी समृध्दी महोत्सवाचं आयोजन**

4. **आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारताचा पहिला सामना आज दुबईत संयुक्त अरब अमिरातीशी रात्री ८ वाजता सुरु होणार**

**------------------------------------------**

जनसुरक्षा विधेयक विरोधी आंदोलन

महाराष्ट्र जनसुरक्षा कायद्याविरोधात महाविकास आघाडीतर्फे आज राज्यात विविध ठिकाणी आंदोलन केलं जात आहे.नागपुर शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटी तर्फे महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयका विरोधात आज व्हेरायटी चौकात आंदोलन करण्यात आलं. नागरिकांची सुरक्षितता, कायदा आणि सुव्यवस्था तसंच विकासाशी संबंधित प्रश्न त्वरित सोडवण्याची मागणी यावेळी करण्यात आली. हे विधेयक लोकशाही विरोधी आणि जनतेच्या हक्कांवर गदा आणणारे असून काँग्रेस कधीही असे धोरण सहन करणार नाही अशी भूमिका आमदार विकास ठाकरे यांनी यावेळी मांडली. छत्रपती संभाजीनगरच्या क्रांती चौकात महाविकास आघाडीनं आंदोलन केलं. सरकारनं या आंदोलनाची गंभीर दखल घ्यावी अन्यथा हे आंदोलन अधिक व्यापक करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. सोलापूर इथंही महाविकास आघाडीनं जनसुरक्षा कायदा रद्द करण्याची मागणी करत मोर्चा काढला. त्यानंतर पूनम गेट इथं झालेल्या सभेत जनसुरक्षा कायद्याच्या प्रती जाळत सरकारचा निषेध केला.

याशिवाय नाशिक, रत्नागिरी,बीड , धुळे आदी शहरांत देखील आंदोलनं करण्यात आली.

-------------------------------------------

पीयूसी प्रमाणपत्र

पीयूसी प्रमाणपत्र नसलेल्या वाहनांना इंधन न देण्याचा निर्णय राज्य सरकार लवकरच घेणार आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज मुंबईत घेतलेल्या बैठकीत ही माहिती दिली. राज्यातल्या प्रत्येक पेट्रोल पंपावर सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या आधारे इंधन भरण्यासाठी येणाऱ्या प्रत्येक वाहनाचा वाहन क्रमांक तपासला जाईल. त्यानुसार वाहनाच्या पीयूसी वैधता कळेल. अवैध पद्धतीने पीयूसीदेणाऱ्या टोळींविरोधात धडक मोहीम राबवण्याचे आदेशही सरनाईक यांनी दिले. भविष्यात प्रत्येक पेट्रोल पंपावर 'नो पीयूसी नो फ्युएल' उपक्रमाची अंमलबजावणी सक्तीने करण्यात यावी, असे निर्देश सरनाईक यांनी दिले आहे. भविष्यात प्रत्येक पेट्रोल पंपावर 'नो पीयूसी नो फ्युएल' उपक्रमाची अंमलबजावणी सक्तीने करण्यात यावी, असे निर्देश सरनाईक यांनी दिले आहे.

-------------------------------------------

वस्तू आणि सेवाकर-प्रतिक्रिया

वस्तू आणि सेवाकर परिषदेनं ५६व्या बैठकीत वस्तू आणि सेवा कर रचनेच्यासु-सूत्रीकरणाला मान्यता दिली असून यापुढे फक्त ५ आणि १८ टक्के अशी दोन स्तरांत जी.एस.टी.कर आकारणी होईल. या सुधारणेचं स्वागत व्यापारी, सामान्य नागरिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर करत आहे. नागपूरच्या रक्षक मार्ट सुपर शॉपचे संचालक ज्ञानेश्वर रक्षक यांनी या संदर्भात प्रतिक्रिया दिली -

***(होल्ड बाईट- ज्ञानेश्वर रक्षक ३० सेकंद)***

***(भारतामध्ये सर्वात मोठा वर्ग हा शेतीवर अवलंबून आहे. त्यांचा व्यवसाय मुळातला शेती आहे आणि आज यंत्रसामग्रीचा मोठ्या प्रमाणात उपयोग हा शेतीमध्ये होतो आहे जीएसटी कमी झाल्यामुळे ट्रॅक्टर आहे आणि आणखी काही अवजार आहेत जे शेतीमध्ये उपयोग येतात. त्या अवजारांवर जीएसटी कमी झाल्यामुळे मला वाटतं शेतकऱ्यांना दिलासा मिळेल आणि आमचा शेतकरी जास्तीत जास्त हा त्या यंत्रसामग्रीचा उपयोग करून माझ्या राष्ट्राच्या उत्पादनामध्ये कृषी उत्पादनामध्ये स्वतःला सिद्ध करेल.)***

-------------------------------------------

ओबीसी प्रमाणपत्र

कुणबी नोंदी आहेत, त्यांनाच अध्यादेशाप्रमाणे प्रमाणपत्र मिळणार असून त्यासाठी प्रमाणपत्र, कुुणबी नातेसंबंध, ग्रामसमिती, तहसीलदारांच्या स्तरावरील समितीचा अहवाल घ्यावा लागणार आहे. वंशावळ जुळल्यानंतर आणि सर्व कागदपत्रांच्या पूर्ततेनंतरच दाखला देण्यात येईल, अशी माहिती मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. इतर मागासवर्गीय संदर्भात मंत्रिमंडळ उपसमितीची पहिली बैठक मंत्रालयात पार पडली. इतर मागासवर्गीय (ओबीसी) समाजात ३५३ जाती आहेत. या जातींवर अन्याय होऊ नये आणि कुणबी मराठा - मराठा कुणबी प्रमाणपत्र चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे दिले जाऊ नये, ही अपेक्षा सदस्यांनी व्यक्त केली असल्याचं चंद्रशेखर बावनकुळे यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

-------------------------------------------

बंजारा मोर्चा

हैदराबाद गॅझेटियर प्रमाणे महाराष्ट्रातील बंजारा समाजाचा ST अर्थात अनुसूचीत जमाती प्रवर्गात समावेश करण्यात यावा या मागणीसाठी बुलढाणा जिल्ह्यातील सर्व गोर बंजारा समाजाच्या वतीने खामगाव येथील उपविभागीय कार्यालया समोर आज मोर्चा काढण्यात आला. तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना खामगाव तहसील कार्यालय मार्फत निवेदन सादर करण्यात आलं.

-------------------------------------------

ॲडव्होकेट धर्मपाल मेश्राम

नागपूर महानगरपालिकेत आपली बस तसेच विविध विभागांसाठी बाह्य स्त्रोत एजन्सी यंत्रणा द्वारे मनुष्यबळ भरती करण्यात येते परंतु ही भरती करताना संबंधित निविदा सामंजस्य करार या प्रक्रियेमध्ये सदोष कार्य प्रणाली आढळली असून या संदर्भातील तक्रारी राज्य मागासवर्ग आयोगाला प्राप्त झाल्या होत्या .त्या अनुषंगाने आपण महानगरपालिका आयुक्त आणि परिवहन आयुक्तांना आवश्यक कागदपत्र सादर करण्यासह नोटीस बजावली होती परंतु संबंधित अधिकाऱ्यांनी आपल्याला अपुरी माहिती दिली असं राज्य मागासवर्ग आयोगाचे उपाध्यक्ष ॲडव्होकेट धरमपाल मेश्राम आज नागपुरात घेतलेल्या पत्रकार परिषदेत म्हणाले

***(होल्ड बाईट - धर्मपाल मेश्राम -25 सेकंद)***

***परंतु त्यांनी अपुरा डेटा आमच्याकडे उपलब्ध करत आयोगाला देखील अंधारात ठेवण्याचं काम केलेलं आहे. मी आता या संदर्भाने सामंजस्य करार असेल,निविदा शर्तींच्या अटी तरतूदी असतील किंवा निविदा राबवण्याची प्रक्रिया पद्धत असेल याच्या सर्व कागदपत्रांसह दिनांक 23 सप्टेंबर ला आयोगाच्या कार्यालयामध्ये या सगळ्या लोकांनी शपथपत्रासह हजर राहण्यासंबंधी नोटीस बजावली आहे.)***

**------------------------------------------**

किसान समृद्धी मेळावा

वातावरण बदलातील विविध आपत्तींना सामोरे जाऊन शेतीसाठी कटीबद्ध असलेल्या शेतकऱ्यांना शाश्वत शेतीचा मंत्र मिळावा, तसंच विविध शेतीपूरक योजनातून त्यांची समृद्धी व्हावी यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागामार्फत रामटेक येथील नेहरू मैदानात १२ सप्टेंबर रोजी शेतकरी समृध्दी महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. या महोत्सवानिमित्त मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, यांसह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहे. या महोत्सवात कृषी प्रदर्शनीचे देखील आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये सेंद्रीय शेती उत्पादने, विविध पशुधन, गोविज्ञान आणि अनुसंधान केंद्र देवलापार, माती परीक्षण, कृषी यांत्रीकीकरण आणि विविध उपकरणे, तसंच पीएमएफएम योजनेअंतर्गत निर्मित कृषी उत्पादने या विषयांच्या स्टॉल्सवरुन शेतकऱ्यांना अत्याधुनिक माहीती दिली जाणार आहे. या महोत्सवाचा अधिकाधिक शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असं आवाहन राज्याचे अर्थ आणि कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी केलं आहे.

**------------------------------------------**

पाणंद रस्ते

राज्यातील शेती क्षेत्रातील दळणवळणाची समस्या सोडवण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते' या नवीन योजनेची घोषणा करण्यात आली आहे. त्याबरोबरच विधानसभा आमदारांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याचा निर्णय घेण्यात आला असून या रस्त्यांसाठी सीएसआर फंडातून निधी उपलब्ध करण्यात यावा तसेच यासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष तयार करण्यात येणार असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. सह्याद्री अतिथीगृह इथं झालेल्या या बैठकीत हे निर्णय घेण्यात आले.

**------------------------------------------**

मस्कऱ्या गणपती

वैदर्भीय संस्कृतीचे वेगळेपण जपणाऱ्या भोसलेकालीन हाडपक्या अर्थात मस्कऱ्या गणपतीची आज बुधवारी सीनिअर भोसला पॅलेस इथं महाराजा ऑफ नागपूर ट्रस्टतर्फे प्रतिष्ठापना होणार आहे. या पृष्ठभूमीवर विविध सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. श्रीमंत राजे खंडोजी महाराजांनी सुरू केलेली परंपरा जपत १८ भुजा गणेशाची स्थापन होत आहे. त्यानंतर विवीध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजिण्यात आले आहेत.

-------------------------------------------

आशिया चषक क्रिकेट

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारताचा पहिला सामना आज दुबईत संयुक्त अरब अमिरातीशी होणार आहे. दुबई इंटरनॅशनल स्टेडियममध्ये रात्री 8 वाजता हा सामना सुरू होईल.येत्या २८ सप्टेंबरपर्यंत सुरू राहणाऱ्या या स्पर्धेच्या अ गटात भारत, पाकिस्तान, ओमान आणि यूएईचा समावेश आहे. तर ब गटात श्रीलंका, अफगाणिस्तान, हाँगकाँग आणि बांगलादेश यांचा समावेश आहे.

-------------------------------------------

हवामान

उद्या यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांसाठी मुसळधार पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर परवा दिनांक १२ सप्टेंबर रोजी संपूर्ण विदर्भात वादळी पर्जन्यमान राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.दरम्यान तीन दिवसाच्या विश्रांती नंतर आज भंडारा जिल्ह्यात पावसाने दमदार हजेरी लावली आहे. दुपारच्या सुमारास वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे नागरिकांना उकाड्यापासून तात्पुरती सुटका मिळाली असून या पावसामुळे धान शेतीला फायदा होणार आहे.

-------------------------------------------

ग्राम उत्कर्ष अभियान

धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानाला जोडून 'आदि-कर्मयोगी-उत्तरदायी शासन कार्यक्रम' केंद्र शासनाकडून राष्ट्रीय पातळीवर हाती घेण्यात आला आहे.या योजनेत महाराष्ट्रातील २१४ तालुके आणि ४ हजार ९७५ गावांचा समावेश करण्यात आला आहे. विविध २५ योजनांचा आदिवासींना वैयक्तिक लाभ, तसेच गावपातळीवर सामूहिक लाभ देण्यासाठी हे अभियान आहे.

-------------------------------------------